# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,पोस्ट बॉक्स नं.२१९.

सामनगाव रोड,नाशिक रोड,नाशिक-४२२ १०१.

फोन नं. (०२५३) २४६१४७९ फॅक्स नं. (०२५३) २४५५३०१.

ई-मेल-ronashik.dte@gmail.com Website- www.dtensk.org


जा.क्र.तंशि/विकाना/आस्था/भप्र-२०१५/ दिनांक-

## ● पद भरती ●

**सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक** यांचे कार्यालयाच्या अधिनस्त विविध शासकीय शैक्षणिक संस्थेतील / कार्यालयांतील खालील रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून खालील अटींच्या अधीन राहून स्पर्धा परीक्षेसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित पुणे. (MKCL) यांच्यामार्फत On line पध्दतीने दि २१/०१/२०१५ ते दि. २८/०१/२०१५ पर्यंत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारांना सदर परिक्षेसाठी व या पुढील निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

(०१) पदसंख्या, आरक्षण व अर्हता :-

| पद क्रमांक | पदाचे नांव व वेतन श्रेणी | रिक्त पदांची संख्या | आरक्षण व समांतर आरक्षण | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | **गट क** | | |
| ०१ | डाटा एन्ट्री ऑपरेटर ९३००-३४४००/- ग्रेड वेतन ४२००/- | ०१ | खुला (सर्वसाधारण) | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (SSC) उत्तीर्ण.<br>डाटा एन्ट्री ऑपरेटर अभ्यासक्रम चालविणाऱ्या शासन मान्यताप्राप्त संस्थेचे लाईन / ऑफ लाईन डाटा एन्ट्री यंत्रावरील काम करतांना ताशी १०००० की डिप्रेशन वेग असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिक्षा मंडळ,मुंबई यांचे कॉम्प्युटर ऑपरेटर प्रमाणपत्र अभ्यासक्रम किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांचे डाटा एन्ट्री प्रिपरेशन अॅन्ड कॉम्प्युटर सॉफ्टवेअर प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असेल अशा उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>टंकेलखन - इंग्रजी किमान ४० शप्रमि व मराठी ३० शप्रमि परिक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट काउंसिल ऑफ एक्झामिनेशन यांचेकडील शासकीय वाणिज्यं प्रमाणपत्र. |
| ०२ | लघुटंकलेखक ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/- | ०१ | खुला (सर्वसाधारण) | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (SSC) उत्तीर्ण.<br>लघुलेखन अभ्यासक्रम चालविणाऱ्या शासन मान्यताप्राप्त संस्थेचे मराठी व इंग्रजी किमान ८० शप्रमि वेग असल्याचे प्रमाणपत्र असावे .<br>टंकेलखन- इंग्रजी किंमान ४० शप्रमि व मराठी ३० शप्रमि परिक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट काउंसिल ऑफ एक्झामिनेशन यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | तांत्रिक प्रयोगशाळा सहायक ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/- | १० | अ.जा (महिला) -०१<br>(खेळाडू) -०१<br>अ.ज. (भु.ग्र./प्र.ग्र.) -०१<br>वि.जा.(अंशकालीन) -०१<br>खुला (सर्वसाधारण) -०५<br>(महीला) -०१ | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (**SSC**) उत्तीर्ण.<br>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र शाखेतील पदविका उत्तीर्ण.<br>प्रयोगशाळा/मॅन्युफॅक्चरींग/सर्व्हिसींग/मेंन्टेनन्स/डिझाईन/CNC मशीन हाताळणे, या क्षेत्रातील कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ०४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/- | ०१ | अ.जा. (महिला) | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (**SSC**) उत्तीर्ण.<br>(**PCI**) मान्यताप्राप्त संस्थेतून औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>औषधनिर्माणशास्त्र प्रयोगशाळेतील कमीत कमी तीन वर्ष कामाचा अनुभव. |
| ०५ | विजतंत्री ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/- | ०१ | खुला (माजी सैनिक) | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (**SSC**) उत्तीर्ण.<br>आय.टी.आय. इलेक्ट्रिशीयन ट्रेड उत्तीर्ण किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग अनुज्ञापक प्राधिकरण (Licensing Authority) यांनी निर्गमित केलेले प्रथम श्रेणी पर्यवेक्षक प्रमाणपत्र किंवा एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र<br>वरील अर्हता धारण केल्यानंतरच्या, प्रात्यक्षिक/शिकविण्याच्या अनुभवास प्राधान्य. |
| ०६ | लिपीक -टंकलेखक ५२००-२०२००/- ग्रेड वेतन १९००/- | ०४ | अ.जा. (महिला) -०१<br>खुला (सर्वसाधारण) -०२<br>इमाव (सर्वसाधारण) -०१ | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (**SSC**) उत्तीर्ण.<br>टंकलेखन-इंग्रजी किमान ४० शप्रमि व मराठी किमान ३० शप्रमि परीक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट कॉन्सील ऑफ एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |

| **गट ड** | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७ | ग्रथालय शिपाई / शिपाई/ हमाल ४४४०-७४४०/- ग्रेड वेतन १३००/- | ०९ | अ.जा.(माजी सैनिक) - ०१<br>अ.ज.(महिला) -०१<br>भ.ज.(क) (महिला) -०१<br>इमाव (सर्वसाधारण) -०१<br>खुला (सर्वसाधारण) - ०४<br>(अपंग,सर्वसाधारण) -०१ | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण.<br>आवश्यक बुध्दीमत्ता व गट ड ची कामे करण्यास शारीरीकदृष्टया सक्षम. |
| ०८ | प्रयोगशाळा परिचर ४४४०-७४४०/- ग्रेड वेतन १३००/- | ०१ | खुला (माजी सैनिक) | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून इयत्ता सातवी परिक्षा उत्तीर्ण.<br>आवश्यक बुध्दीमत्ता व गट ड ची कामे करण्यास शारीरीकदृष्टया सक्षम. |

**<u>उपर्निर्दिष्ट सर्व पदांसाठी अतिरीक्त आवश्यक शैक्षणिक अर्हताः</u>** वरील अ.क्र. १ ते ७ या पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतचे D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही मुदतवाढीची विनंती मान्य न करता संपुष्टात आणण्यात येईल.

टिप - सदरच्या जाहीरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमीजास्त बदल होण्याची शक्यता आहे.काही अपरीहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार,पदांची संख्या,समांतर आरक्षण,सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे,परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे,अंशतः बदल करणे,तसेच सेवाभरती पक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार,सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नाशिक हे स्वताकडे राखून ठेवत आहे.भरतीप्रक्रिये संदर्भात उदभवणारे वाद तक्रारी इ.बाबत सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील.

**(०१) कमाल व किमान वयोमर्यादा (दिनांक ३१/०१/२०१५ रोजी )**

(१) खुला प्रवर्गासाठी किमान १८ व कमाल ३३ वर्षे

(२) मागास प्रवर्गासाठी किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल ३८ वर्षे

(३) माजी सैनिक व अपंग यांचे बाबतीत ४५ वर्षे पर्यंत कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम..

(४) अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथिलक्षम.

(५) शासन सेवेतील कर्मचा-यांकरिता सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००२/३७९/ प्र.क्र.२२/०२/१२, दिनांक ०१/११/२००३ नुसार वरील पदांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये वयाची पूर्णतः सूट अनुज्ञेय नाही. तथापि ज्या पदांसाठी अनुभवाची अट विहीत केलेली आहे, फक्त त्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा अधिक अनुभवाचा कालावधी इतपत कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम करण्यात येईल.

(६) प्रकल्पग्रस्त भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी ४५ वर्षे.

**(०२) <u>परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :</u>**

**अ)** सर्व पदांसाठी लेखी परीक्षा अनिवार्य आहे.

**ब)** लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाची असेल. वरील सर्व पदांच्या लेखी परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील परीक्षा घेण्यात येईल. परिक्षेतील एकूण गुणांचा तपशील खालील प्रमाणे राहील.

| पद क्रमांक | लेखी परिक्षा | व्यावसायिक चाचणी | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १ ते ५ | १२० | ८० | २०० |
| ६ | २०० | --- | २०० |
| ७ व ८ | ६० | ४० | १०० |

व्यावसायिक चाचणीकरीता लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविलेले उमेदवार पात्र ठरतील.परंतू व्यावसायिक चाचणीकरीता बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या एकूण पात्र होणाऱ्या उमेदवारांच्या संख्येवर ठरविण्याचा अधिकार सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना राहील.

**(क)** उमेदवारांना लेखी परीक्षा व व्यावसायीक चाचणी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

**(ड)** लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया / निळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

**(इ)** उमेदवारांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

**(फ)**सर्व पदांकरीता लेखी परिक्षा नाशिक येथे घेण्यात येईल.

**(ग)** कौशल्य चाचणीचे ठिकाण नंतर (MKCL) यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

(०३) <u>सर्वसाधारण अटी व शर्ती :</u>

१. **अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा.**

**अ)** उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्मदाखला सादर करणे आवश्यक राहील.

**ब)** सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील.

**क)** उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील.इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

२. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३. एखादया उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

४. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड/नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.

५. शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे कार्यालयाचे "ना हरकत" प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच अविवाहीत असणाऱ्या अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहील.लहान कुटुंब असलेबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना एमकेसीएल च्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

७. अनुभवाच्या बाबतीत तासिका,नियतकालीक,अर्धवेळ,विदयावेतन,अभ्यागत,विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणनू नेमणूकीचा कालावधी,अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.अंशकालीन कर्मचाऱ्याने त्याच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे केल्याचे पुरावे कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

८. जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे पात्रताधारक असल्याची खात्री करुनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत.

९. वरील सर्व पदांना शासन निर्णय क्र.सनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ प्रमाणे नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

**(०४)आरक्षण व समांतर आरक्षण**

१ मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादीत राहील. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकीत प्रत व मुळ कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

२ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्रक्र-१०६४/ २०१११६ब दि. १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्याची नियुक्ती पूर्वलक्षीपणे रदद करण्यात येईल.

३ समांतर आरक्षण हे सामाजीक आरक्षणांतर्गत असल्याने त्यास वाढीव म्हणून गणता येणार नाही.

४ समांतर आरक्षण हे सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्रक्र.-३१/९८/१६अ, दि. १६.३.१९९९ अन्वये व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही/१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३/०८/२०१४ नुसार राहील

५ **प्रमाणपत्रे व प्रमाणपत्र पडताळणी**

- शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र
- अ.ज. /अ.जा.अर्जदार वगळून इतरांकरीता उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबत (Non-Cremy-layer Certificate) दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत वैध असलेले व जास्तीत जास्त अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत निर्गमित झालेले प्रमाणपत्र,
- खुल्या प्रर्वगातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या महिला पदासाठी दावा करीत असलेल्या महिलांनी, **महिला आरक्षणाकरीता आवश्यक असलेले** उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे, जास्तीत जास्त अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले, विहीत नमुन्यातील नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.
- अपंग उमेदवारांकरीता किमान ४० टक्के अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रमाणत्र.
- भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांकरीता जिल्हाधीकारी अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र
- अंशकालीन उमेदवारांकरीता सेवायोजन कार्यालयाकडे अनुभवाची नोंद असलेले व सेवायोजन कार्यालयाने निर्गमित केलेले नोंदणी पत्र अथवा प्रमाणपत्र.

वरील प्रमाणपत्रांच्या **साक्षांकीत व मूळ प्रती,** कागदपत्रे तपासणीचे वेळेस सादर करणे अनिवार्य आहे. साक्षांकीत प्रति केंद्र /राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यानीच केले असावे. तसे नसल्यास व किंवा चूकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल. **दिनांक २८/०१/२०१५ नंतर निर्गमित केलेली कोणतीही प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.**

६ महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५-०५-२००१ मधील तरतुदीनुसार राहील.

७ अर्ज सादर करणा-या विवाहीत महिलांचे नावात/आडनावात विवाहानंतर बदल झालेला असेल तर नावात बदल केल्याबाबत सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील तसेच महिला उमेदवार अर्ज करण्याच्या दिनांकास विवाहीत असल्यास,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र हे विवाहानंतरच्या नावाने असणेही आवश्यक आहे. सदर महिलांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र पतीच्या उत्पन्नाच्या दाखल्यावर आधारीत असणे आवश्यक आहे.

८ शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.-३१/९८/१६अ दि. १६-३-१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सामाजिक आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

९ सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील पत्र क्र. पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ दि. २६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१० अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रं. राक्रीधो – २००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि. ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ट अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावे.

११ अपंग उमेदवारांकरिता किमान ४० टक्के अपंग असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या विहीत नमुन्यातील प्रमाणपत्राची छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२ सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. पअंक – १००९/प्र.क्र. २००/२००९ / १६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर २००९ नुसार सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.

१३ अशंकालीन कर्मचाऱ्यांचे शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व त्याबाबतचा पुरावा कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१४ शासन परिपत्रक क्र. पीआरई/२००४/३८५५/प्राशि-१, दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एक व्यक्तीला शासन परिपत्रकात नमूद कुटुंबातील सभासदांस उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यांबाबत तरतूद आहे. माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

१५ समांतर आरक्षणांतील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्वसाधारण प्रवर्गातून उमेदवाराची निवड करण्यात येईल.

(०५) <u>ऑन लाईन अर्ज करण्याची पध्दत / मार्गदर्शक सूचना :</u>

- अर्ज फक्त ऑन लाईन पध्दतीने स्वीकारले जातील.
- अर्जदारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.
- ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज **http://oasis.mkcl.org/jdte2015** या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.
- ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना MKCL या संस्थेच्या **http://oasis.mkcl.org/jdte2015** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑन लाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCL यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Centre) पत्त्यासह माहिती **http://oasis.mkcl.org/jdte2015** या संकेतस्थळावर **(Website)** देखील उपलब्ध आहे.
- उमेदवाराने http://oasis.mkcl.org/jdte2015 या संकेतस्थळावर Apply Online या लिंक वर क्लिक करावे व सर्व प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registration) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.
- नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form Number) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रीयेसाठी जपून ठेवावा.
- त्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या बँक चलनावर नमूद केलेली फी केवळ **स्टेट बँक ऑफ इंडिया (S.B.I.) किंवा ॲक्सीस बँक (Axis Bank) च्या कोणत्याही शाखेमध्ये दुस-या दिवशी** तसेच तक्त्यातील वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीच्या आंत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी. अर्जाची फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.
- **बँकेत फी भरल्यानंतर दुस-या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरित अर्ज भरावा.**
- **उर्वरित अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचा नवीनतम (Latest) फोटो व स्वतःची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.**
- उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑन लाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेऊन ती स्वतःजवळ ठेवावी.
- वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रीया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षा देण्यासाठी पात्र होईल.
- उमेदवाराच्या माहिती व मदतीकरिता मे. **M.K.C.L. यांच्या कॉल सेंटर वरील दूरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५** वर योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.
- उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी असल्यास नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.
- जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र / आदिवासी विकास प्रकल्प इत्यादी विभागांकडे नांव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी स्वतंत्रपणे रीतसर ऑन लाईन अर्ज करणे आवश्यक आहे. नांव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे. अर्ज ऑन लाईन प्रक्रीयेद्वारेच स्वीकारले जातील, अन्य प्रक्रीयेद्वारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(०६) परीक्षा शुल्क :

१. सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी रू. ४०० /- (रुपये चारशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) परीक्षा शुल्क असून सदर परीक्षा शुल्क रोखीने **State Bank of India / Axis Bank** च्या कोणत्याही शाखेत भरावी.

२. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित छाया प्रत अभिलेख पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहील

३. सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.

**(०७) ऑन लाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक :**

| अ क्र | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (Registration) करण्यांचा कालावधी | २१ /०१/२०१५ | २८/०१/२०१५ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया / ॲक्सीस बँक (SBI / Axis Bank) च्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | २१ /०१/२०१५ | ३०/०१/२०१५ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक ३० /०१/२०१५ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्यांचा कालावधी. | ०२/०२/२०१५ | |
| ४ | लेखी परिक्षेचा **संभाव्य दिनांक** | ०८/०२/२०१५ | |
| ५ | लेखी परिक्षेच्या निकालाचा **संभाव्य दिनांक** | २०/०२/२०१५ | |

**या प्रकरणी होणारे बदल व्यक्तिशः कोणत्याही उमेदवारांना कळविण्यात येणार नाहीत, त्यासाठी सर्व उमेदवारांनी अर्ज भरल्यापासून भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत http://oasis.mkcl.org/jdte2015 हे संकेतस्थळ सातत्याने पहावे.**

**(०८) सर्वसाधारण सूचना :**

१) अर्ज भरण्यापुर्वी अर्जदाराने, जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यकअर्हता आपण पूर्ण करत आहोत का याची खात्री करुन घ्यावी. उमेदवार नियुक्तीकरीता पात्र असल्यानंतरच हे कार्यालय मूळ कागदपत्रांच्या संदर्भातील अर्हतेच्या अटींची पडताळणी करेल. या जाहिरातीत नमूद करण्यांत आलेल्या विहित आवश्यक अर्हतेचा पूर्तीच्या अधीन राहून उमेदवाराचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पुर्णतः तात्पुरता असेल.

२) ज्या उमेदवारांनी Online नोंदणी केलेली आहे. आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केलेले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे, त्यांना लेखी परीक्षेकरीता Online Call Letters Download करण्याची मुभा आहे. Online call Letters पाठवितांना अर्जाची तपशीलवार छाननी करण्यात येणार नाही. Call Letters, http://oasis.mkcl.org/jdte2015 या संकेत स्थळावरुन Download करता येतील.

३) परीक्षेकरीता येताना उमेदवारांनी पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालवण्यांचा परवाना / पासपोर्ट / मतदान कार्ड इत्यादीची मूळ प्रत सोबत आणणे बंधणकारक आहे.

४) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने आपली संपूर्ण शैक्षणिक माहिती भरावी. जसे की, (४ थी / ७ वी / १० वी / १२ वी / डिप्लोमा / ग्रॅज्युएशन )

**या प्रकरणी होणारे बदल व्यक्तिशः कोणत्याही उमेदवारांना कळविण्यात येणार नाहीत, त्यासाठी सर्व उमेदवारांनी अर्ज भरल्यापासून भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत http://oasis.mkcl.org/jdte2015 हे संकेतस्थळ सातत्याने पहावे.**

**ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक कार्यालयाला किंवा MKCL ला पाठविण्याची आवश्यकता नाही.**

दिनांक : /    /२०१५

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.